Impact Factor : 1.9152 (UIF)
Volume - 3 | Issue - 9 | May– 2017

"स्त्री शिक्षण व रमाबाई रानडे"

प्रा.महेश जगन्नाथ साखरे
इतिहास विभाग , डि.बी.एफ.दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय,सोलापूर

- **प्रस्ताविक :-**

' मुलींसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात यावे याकरीता पुण्यात जे प्रभावी आंदोलन झाले त्याच्या श्रीमती रमाबाई रानडे अग्रेसर नेत्या होत्या. हे आंदोलन म्हणजे स्त्रियांच्या कार्यनिष्ठेचा आणि सार्वजनिक आंदोलनाची उभारणी आणि संचालन करण्यातील तेजस्वी सामर्थ्याचा जनतेपुढे ठेवलेला उत्कृष्ट नमुनाच होता ' असे ' दि अवेकनिंग ऑफ एशियन वुमन हूड ' या पुस्तकात मिसेस मार्गारेट झिन्स यांनी लिहिलेले आहे.'

- **शोधनिबंधाचा उद्देश :-**

स्त्री- शिक्षण विषयक आंदोलनात रमाबाई रानडे यांनी केलेल्या कार्याचा/ योगदान विषयक चर्चा प्रस्तुत निबंधात करण्यात आलेली आहे.

- **शब्दावली :-**

पटेल ॲक्ट, विमेन्स इंडियन असोसिशन, मार्गारेट कझिन्स, सेवासदन संस्था.

- **स्त्री शिक्षणासाठी रमाबाई रानडे यांचे कार्य :-**

सेवासदनाच्या कामातव्यस्त असतानाच रमाबाई यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात दोन महत्वाची आंदोलने झाली. त्यापैकी एका मुलींसाठी सक्तीचे प्राथमिक शिक्षण १९१८ मध्ये मुंबई कायदे कौन्सिलने प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत जो कायदा (पटेल ॲक्ट) संमत केला. त्यानुसार मुंबई इलाख्यातील म्युनिसिपालिटयांना आपल्या भागातील ५ ते १८ वर्षांच्या मुलाना प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याचा अधिकार प्राप्त झाला. त्याला अनुसरुन सातारा, सुरत, वांद्रे येथील म्युनिसिपालिटयांनी प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. या शहरांप्रमाणे पुण्यातही पटेल ॲक्ट राबविण्याचा विचार सुरु झाला. या संदर्भात पुणे म्युनिसिपालिटीने नेमलेल्या प्रा.वैजनाथ काशीनाथ राजवाडे यांच्या अध्यक्षतेखालील कमिटीने आपल्या अहवालाद्वारे सादर केल्या. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करण्याकरीता रु.८६०००/- ची तरतुद असणे गरजेचे होते व इतकी रक्कम ही केवळ नवीनकर बसवूनच वसूल करता येणे शक्य होते. रक्कमेपैकी रु.८०,०००/- हे मुलांच्या सक्तीच्या शिक्षणासाठी व केवळ रु.६,०००/- हे मुलींच्या सक्तीच्या शिक्षणाचा खर्च होता. पटेल ॲक्ट अमंलात आणण्यासाठी बसविण्यात येणाऱ्या नवीन कराराला मंजूरी मिळवण्यासाठी म्युनिसिपालिटीत २० सभासदांपैकी २/३ सभासदांचा होकार आवश्यक होता. १९२० च्या आरंभापासूनच मुलींचे मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण हा विषय पुण्यात लोकांच्या चर्चेत सतत होतो. मुलीचे प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे का? या संदर्भात पुण्यात तीन गट पडले होते.

१. पहिल्या गटाचे संख्याबळ लहान होते. मुलींच्या सक्तीच्या शिक्षणाला पाठिंबा होता.
२. दुसरा गट राजकियदृष्टया जहालांचा होता. त्यांच्या मुलींच्या शिक्षणाला पूर्ण विरोध होता. मात्र मुलांच्या सक्तीच्या शिक्षणासाठी नवीन कर देण्याची त्यांची तयारी होती. म्युनिसिपालिटीची आर्थिक स्थिती सुधारल्यावर मुलींच्या शिक्षणाचा विचार केला जावा असे त्यांचे मत होते.
३. तिसरा पक्ष मात्र शिक्षण मोफत व सक्तीचे करताना मुले-मुली असाभेद असू नये या मताचा होता.

मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे यासाठी रमाबाई रानडे, धोंडे केशव कर्वे इ. मतप्रसारासाठी परिश्रम घेत होते. ८ फेब्रुवारी रोजी ठरावाच्या विरोधकांनी पुण्यात सभा घेतली. सभेला नेमस्त पक्षाचे लोकही उपस्थित होते. ठरावाच्या विरोधात न.चि.केळकर तर ठरावाच्या बाजूने र.पु. परांजपे, कमलाबाई देशपांडे यांची भाषणे झाली. ठरावाच्या दिवशी १२ फेब्रुवारीला विठ्ठल रामजी शिंदे यांच्या भगिनी जन्नाक्का शिंदे व रमाबाई यांच्या नेतृत्वाखाली पुण्यातील पूर्व व पश्चिम भागातील स्त्रियांनी एक जंगी मिरवणूक काढली. कौन्सिलची सभा सुरु होण्याआधी रमाबाई यांच्या नेतृत्वाखाली एक डेप्युटेशन म्युनिसिपल कौन्सिलचे अध्यक्ष लक्ष्मण आपटे यांना भेटले व आपली मागणी त्यांना सादर केली. परंतु त्या दिवशी कोणात्याही ठरावाच्या बाजूने कायदयाने जेवढी मते पडायला हवी होती. तेवढी न पडल्याने कौन्सिलने या प्रश्नाबाबत विचार एक महिना पुढे ढकलला.

सक्तींच्या प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न जून १९२१ पर्यंत तहकूब राहिला. नंतर कौन्सिलचे अध्यक्ष आपटे यांनी ५ जुलै रोजी बैठक घेऊन म्युनिसिपालिटीचे सभासद, शिक्षणाविषयी आस्था असणारे प्रमुख नागरिक शिक्षणतज्ञ इ.ना. विचारविनिमयासाठी बोलाविले. याच सुमारास शिक्षणमंत्री झालेल्या र.पु. परांजपे यांनी ज्या म्युनिसिपालिटीची सांपत्तिक स्थिती चांगली नसेल, तिला सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी अनुदान मिळू शकेल असे जाहिर केले. त्यामुळे पुणे म्युनिसिपालिटीने मुलांप्रमाणे मुलींनाही प्राथमिक शिक्षण सक्तीचे व्हावे असे पत्रक काढले. हे पत्रक म्हणजे मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व्हावे यासाठी सुरु केलेल्या आंदोलनाचा विजय होता.

मुलींना मोफत व सक्तीच्या शिक्षणासंबंधीच्या या लढयासाठी रमाबाईनी अथक परिश्रम केले. वास्तविक पाहता या आंदोलनाचे पायाभूत तत्व स्त्री-पुरुष समानतेचे सर्वव्यापी असे तत्व होते. या लढयाला देशभर सार्वत्रिक महत्व आले होते. या लढयासंबंधीची माहिती हिंदूस्थानातील निरनिराळया शहरातील स्त्रियांना व संस्थांना व्हावी यासाठी त्या प्रयत्नशील राहिल्या. रमाबाई रानडयांना त्यांनी सुरु केलेल्या या लढयासाठी पाठिंबा व्यक्त करणारी पत्रे हिंदूस्थानाच्या विविध भागातून झाली. रमाबाईच्या या प्रचाराच्या कामी अडयार (मद्रास) येथील स्त्री नेत्या आणि ' विमेन्स इंडियन असोसिएशन ' च्या संस्थापिका झिन्स यांचे विशेष सहकार्य लाभले.

● उपसंहार :-

महिलांना आपल्या ठायीच्या कर्तृत्वाची, क्षमतांची, हक्क, अधिकारांची जाणीव व्हावी व त्यांना स्वावलंबी, प्रतिष्ठित जीवन जगता यावे यासाठी शर्थीचे प्रयत्न करणारे प्रगतिशील विचारसरणीचे व्यक्तिमत्व म्हणून रमाबाई रानडे स्मरणात राहतात. न्यायमूर्ती रानडे यांनी जपलेले स्त्री शिक्षण व सुधारणेचे व्रत रमबाईंनी आजन्म चालविले शिक्षणा पासून वंचित राहिलेल्या स्त्रियांसाठी विविध प्रकारचे वर्ग त्यांनी सुरु केले. स्त्री सुधारणांच्या त्यांच्या खटाटोपाचे समूर्त रुप म्हणून ' सेवासदन संस्था ' महिलांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी पुस्तकी शिक्षणाच्या जोडीनेच व्यवसाय शिक्षण, हस्तकला, कौशल्याच्या वस्तूंचे प्रदर्शन, स्त्री गुन्हेगारांचे पुनर्वसन, स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळावा यासाठी सरकार दरबारी प्रयत्न असे रमाबाईचे बहुआयामी कार्य स्मरणीय आहे.

● संदर्भसूची :-

१. गोपुजकर, प्रतिभा : कर्तृत्वशालीनी (भाग पहिला), श्रीविद्या प्रकाशन, पुणे,२००७.
२. फाटक, न.र. न्या.महादेव गोविंद रानडे चरित्र, पुणे,१९६९.
३. रानडे, प्रतिभा 'रमाबाई रानडे' महाराष्ट्राची मानचिन्हे (भाग दुसरा), मॅजेस्टीक प्रकाशन, पुणे, २०००.
४. विद्वांस, माधव श्रीनिवास, श्रीमती रमाबाई रानडे व्यक्ती व कार्य, मॅजेस्टीक प्रकाशन, ठाणे, १९८९ पान. २४०, २४७.
५. कामत, माधवी, रमाबाई महादेव रानडे, गंधर्व वेद प्रकाशन, पुणे, २०१० पान. १११, ११३.